# जिल्हाधिकारी , अमरावती यांचे कार्यालयातील पदभरतीसाठी जाहिरात.

क्र.कार्या-२१/अ.का./आस्था/कावि- ११०९ /२०११, दिनांक २९ सप्टेंबर, २०११.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीबीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/ १६-ब दिनांक ०२ ऑगस्ट, २०११ तसेच मा. मुख्य सचिव यांचे अ.शा. पत्र दिनांक ०९ ऑग्स्ट २०११ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी अमरावती यांचे आस्थ्यापनेवरील, लघुटंकलेखक, लिपीक- टंकलेखक, वाहन चालक व गट ड शिपाई या संवर्गामधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याकरीता खालील रिक्त पदांसाठी पात्र उमेदवारांकडून दिनांक **१२ ऑक्टोंबर, २०११** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अ) लघु टंकलेखक (वेतन बँड ५२००-२०२०० (ग्रेड वेतन- २४००)**

**आवश्यक शैक्षणीक पात्रता-**

१. एस.एस.सी/शालांत परीक्षा उत्तीर्ण
२. मराठी व इंग्रजी लघुलेखन ८० श.प्र.मि.
२. **टंकलेखन** - मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि.
३. शासनमान्य संगणक प्रशिक्षण कोर्स (नियुक्ती पासून दोन वर्षात उत्तीण होणे अनिवार्य

| प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | अपंग | महिला | खेळाडू | |
| अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | १ |
| **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **°** | **१** |

**ब ) लिपीक-टंकलेखक (वेतन बँड ५२००-२०२०० (ग्रेड वेतन- १९००)**

**आवश्यक शैक्षणीक पात्रता-**

१. एस.एस.सी/शालांत परीक्षा उत्तीर्ण
२. **टंकलेखन** - मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि.
३. शासनमान्य संगणक प्रशिक्षण कोर्स (नियुक्ती पासून दोन वर्षात उत्तीण होणे अनिवार्य

| प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अपंग | अंशकालीन | महिला | खेळाडू | |
| अनु.जमाती | ५ | अस्थिव्यंग ४ पदे | १ | २ | ० | २ |
| विमुक्त जाती (अ) | १ | | ० | ० | ० | १ |
| विशेष मागास प्रवर्ग | २ | | ० | १ | ० | १ |
| सर्वसाधारण | ४ | | | | | |
| **एकूण** | **१२** | **४** | **१** | **३** | **°** | **४** |

**<u>अपंग आरक्षण</u> :- ४ पदे अस्थिव्यंग**

**क ) वाहन चालक (वेतन बँड ५२००-२०२०० (ग्रेड वेतन- १९००)**

**शैक्षणिक पात्रता**

१) इयत्ता चौथा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक

२) जड/हलके वाहन चालविण्याबाबत मोटार व्हेईकल ॲक्ट,१९३९ नुसार अनुज्ञप्ती धारण करणे आवश्यक

३) वाहन (कार/जीप) चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक

| प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | इतर |
|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | महिला | खेळाडू | |
| अनु.जमाती | १ | ० | ० | ० | १ |
| विमुक्त जाती (अ) | १ | ० | ० | ० | १ |
| भटक्या जमाती (क) | १ | ० | ० | ० | १ |
| **एकूण** | **३** | ० | ० | **०** | **३** |

**ड) शिपाई (वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे- १३००)**

**शैक्षणिक पात्रता :- ४ था वर्ग उत्तीर्ण.**

| प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अपंग | माजी सैनिक | महिला | खेळाडू | |
| अनु.जाती | ३ | अस्थिव्यंग ०३ पदे कर्णबधीर ०१ पद | १ | १ | ० | १ |
| अनु.जमाती | ३ | | ० | १ | ० | २ |
| विमुक्त जाती (अ) | १ | | ० | ० | ० | १ |
| भटक्या जमाती (क) | २ | | ० | १ | ० | १ |
| भटक्या जमाती (ड) | २ | | ० | १ | ० | १ |
| सर्वसाधारण (खुला) | ४ | | | | | |
| **एकूण** | **१२** | **४** | १ | **४** | **०** | **६** |

**<u>अपंग आरक्षण</u> :- ३ पदे अस्थिव्यंग, ०१ पद कर्णबधीर**

**निवड प्रक्रिया कार्यक्रम:-**

| | | |
|---|---|---|
| १. | जाहीरात प्रसिध्द करणे | - २९ सप्टेंबर, २०११ |
| २. | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | - **१२ ऑक्टोंबर,२०११** |
| ३. | पात्र/अपात्र उमेदवारांची याची प्रसिध्द करणे | - १३ ऑक्टोंबर,२०११ |
| ४. | प्रसिध्द केलेल्या यादीमधील चूकीबाबत उमेदवारांनी कार्यालयामध्ये समक्ष लेखी अर्ज करण्याची अंतिम तारीख | - १५ ऑक्टोंबर,२०११ |
| ५. | झालेल्या चुकांची दुरुस्ती करुन पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | - १६ ऑक्टोंबर,२०११ |
| ५. | प्रत्यक्ष लेखी परीक्षा घेणे | - **३० ऑक्टोंबर,२०११** |

६. लेखी परीक्षेचा निकाल,अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**<u>सर्वसाधारण अटी :-</u>**

**१.** सदर पदासाठी उमेदवारांचे वय दिनांक २९ सप्टेंबर,२०११ रोजी किमान १८ वर्ष आवश्यक असून कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष राहील.

**२.** अपंग उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षा पर्यत शिथील राहील.

**३.** खेळाडू उमेदवरांसाठी वयोमर्यादेत ५ वर्षा पर्यत वयाची अट शिथील राहील.

**४.** माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षा पर्यत शिथील राहील.

**५.** पदवीधर अंशकालीन उमेदवारांकरीता ४६ वर्षा पर्यत शिथील राहील.

**अ ) माजी सैनिक उमेदवारांकरिता**

१. माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरिता पात्र उमेदवार.

**क) महिला उमेदवारांकरिता**

१. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलां साठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागावर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग,भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

**ड) अपंग उमेदवारांकरीता.** (४० % किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व )

अपंगाकरीता राखीव असलेली पदे ही अस्थिव्यंग व कर्णबधीर या अपंग प्रवर्गाकरीता आहेत. सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३(भाग-३)/१६-अ दिनांक १९.१०.२००७ नुसार अपंगाची उपरोक्त प्रमाणे दर्शविण्यात आलेली पदे ही खुल्या प्रवर्गात दर्शविण्यात आली असली तरी सुध्दा निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्याच सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेण्यात येईल. त्यानुसार कार्यवाही करतांना गुणवत्तेनुसार अपंग उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गात त्यांचे समांतर आरक्षण दर्शविल्यानंतर उक्त स्तंभ क्रमांक ९ मध्ये दर्शविलेल्या संबंधित प्रवर्गाचे पद कमी होईल.निवड झालेल्या उमेदवारास सामाजिक प्रवर्गातंर्गत पद उपलब्ध न झाल्यास उक्त स्तंभ क्रमांक ९ मध्ये दर्शविलेल्या खुल्या प्रवर्गाचे पद कमी होईल.

**६.** मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य.

**७.** अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी (Domicile) असला पाहिजे.

**८.** अर्जदाराने अर्जासोबत सर्व प्रमाणपत्राच्या छायाप्रती (झेरॉक्स) सांक्षाकित (Attested) करुन जोडाव्यात. मुळ प्रती जोडू नयेत.

**९.** जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडावी.

**१०.** महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक) या अधिनियमातील नियम ४(२)(दोन) खालील पदान्वये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**११.** उमेदवाराने आपले अर्ज अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती या पत्यावर दिनांक **१२ ऑक्टोंबर, २०११** पर्यत प्राप्त होतील अशा प्रकारे पोष्टाव्दारे पाठवावे किंवा कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) उक्त पदाकरीता जिल्हाधिकारी

कार्यालय येथे प्रत्यक्ष सादर करावेत. अर्जाची पोच न चुकता घ्यावी. पोष्टाव्दारे **१२ ऑक्टोंबर, २०११** नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. त्याबाबत कोणतीही तक्रार मान्य केली जाणार नाही.

**१२**. आवश्यक शैक्षणीक पात्रता परिपूर्ण नसलेले / अपुर्ण / आवश्यक प्रमाणपत्र सोबत नसलेले अथवा अर्जासोबत आवश्यक रकमेचे कोर्ट फी स्टॅम्प नसलेले अथवा अर्जावर स्वत:चा फोटो नसलेले अथवा चुकीचे भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. अथवा कोणताही पत्र व्यवहार करता येणार नाही.

**१३.** उमेदवारांनी आपल्या अर्जासोबत स्वत:चे नांव व पत्ता असलेला रिकामा लिफाफा (साईज १०.से. मी.X४ से. मी.) व त्यावर रु. ५/- चे पोस्टाचे तिकीट चिकटावे.

**१४.** उमेदवारास लेखी परीक्षेचे ओळखपत्र या कार्यालयाव्दारे तयार करुन पाठविल्या जाईल. त्यावर उमेदवाराने स्वत:चा फोटो चिकटवावा. व राजपत्रित अधिकाऱ्याव्दारे सांक्षांकित ( Attested) करून परीक्षा केंद्रावर जावे. **अर्जासोबत ओळखपत्र जोडण्याची आवश्यकता नाही.**

**१५.** अर्जदाराला लेखी परीक्षेसाठी उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

**१६.** फक्त याच जाहिरातील अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. यांची कृपया नोंद घ्यावी.

**१७.** प्रत्येक अर्जदाराने महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना भरुन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

**१८.** शासन निर्णय दिनांक १९.१०.२००७ नुसार ज्या पदाकरीता कमीत कमी अर्हता इयत्ता १० वी आहे अशा पदाचे लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**१९.** **लघु-टंकलेखक** या पदाकरीता लेखी परीक्षा व २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल.

**२०.** **वाहन चालक** पदाकरीता ९० गुणांची व्यावसायिक चाचणी व १० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

**२१.** **शिपाई** पदाकरीता ७५ गुणांची **लेखी परीक्षा** व २५ गुणांची **तोंडी परीक्षा** घेण्यात यईल.

**२२.** लेखी परीक्षेमध्ये एकूण गुणांच्या किमान ४५% ंगुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**२३.** लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांचे प्रमाण निश्चित करुन गुणानुक्रमे शासन निर्णयातील तरतुदींचे अधिन राहून मुलाखतीसाठी निवड करण्यात येईल अशा निवड झालेल्या उमेदवारांची २५ गुणांची जिल्हा निवड समिती मौखिक परीक्षा घेईल. लेखी परीक्षेत मिळालेले गुण व मौखिक परीक्षेत मिळालेले गुण यांची एकत्रित बेरीज करुन अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल व त्याआधारे गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

**२४.** लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांचे प्रमाण निश्चित करुन गुणानुक्रमे शासन निर्णयातील तरतुदींचे अधिन राहून उमेदवाराची निवड करण्यात येईल व त्यानुसार अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येवून त्याआधारे गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

**२५.** **मागसवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती देण्यात येणार नाही**

**२६.** सदरहू जाहिरातीमध्ये दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. नमुद रिक्त पदांच्या संख्येत पदोन्नती/पदावनती/अनुकंपा भरती /राजीनामा /मृत्यु/अतिरिक्त संवर्ग कक्षा कडून

उपलब्ध कर्मचारी इत्यादी कारणांमुळे पदसंख्या कमीजास्त होवू शकते. **कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही.**

**२७.** एका अर्जदाराचा समांतर आरक्षणानुसार तसेच एका पदाकरीता एकच अर्ज ग्राहय धरण्यात येईल.

**२८.** सदर पदाकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारानी अर्जासोबत **रुपये २००/-** (अक्षरी दोनशे रुपये) व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये **१००/-** (अक्षरी शंभर रुपये) इतके परीक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. सदर शुल्क **न्यायालयीन फी मुंद्राकाच्या स्वरुपात (कोर्ट फी स्टॅम्प)** अर्जामधील विहीत जागेत चिटकवावे. कोर्ट फी स्टॅम्प नसलेले अर्ज नामंजूर करण्यात येईल याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

**२९.** उमेदवाराने यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मागदर्शन केंदाकडे (सेवायोजन कार्यालय) /एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालयामध्ये नोंदविले असेल तरी सुध्दा त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

**२७.** सदरच्या कार्यक्रमाध्ये बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती कडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

**२८.** भरती प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाचेhttp://www.amravati.nic.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल उमेदवारांनी त्यानुसार कार्यवाही करावी. डाक विभागामुळे कोणत्याही प्रकारचा विलंबा झाल्यास त्याबाबतच्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही व त्या करीता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९ सप्टेंबर, २०११
ठिकाण : अमरावती

**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी, अमरावती**

येथे उमेदवाराने फोटो चिकटवावा

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

**दैनिक वर्तमानपत्र -------------- दिनांक २९ सप्टेंबर, २०११ नुसार अर्ज**

प्रती,
मा. अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अमरावती

महोदय,

**विषय :- --------------- या पदाकरीता विनंती अर्ज. (प्रवर्ग------------------------)**

आपले कार्यालयाची दैनिक वर्तमानपत्रात नमुद जाहिरातीनुसार मी, ----------- या पदासाठी अर्ज करीत असून माझा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नांव : ----------------------------------------------
(नाव प्रथम लिहावे )
२. पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता : ----------------------------------------------
(पिनकोडसह)
३. दुरध्वनी/मोबाईल क्रमांक(आवश्यक) :- ----------------------------------------------
४. राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय (नकोअसेल ते खोडा)
५. जन्मतारीख : ----------------------------------------------
दि. २९.०९.२०११ रोजी वय -------------वर्षे-----------महिने--------दिवस

६.अर्जदाराचा प्रवर्ग
अ. जात-----------
ब. प्रवर्ग-------------(अजा/अज/विजाअ/भज ब/भजड/विमाप्र/इमाव/खुला)
(लेखी नमुद करावे)
क. **समांतर आरक्षण** :- ------------------------------
(अपंग/ माजी सैनिक / महिला /अंशकालीन/ यापैकी नाही)
ड. **अपंग**त्वाचा प्रकार-------------------------------------
(कर्णबधीर/अस्थिव्यंग)
(लेखी नमुद करावे)

७.महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय : होय / नाही
८.उन्नत / प्रगत गटात मोडता काय : होय / नाही
९.अर्जदार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य आहे काय : होय / नाही
१०.अर्जदार अंशकालीन कर्मचारी आहे काय : होय / नाही
११.लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय : होय / नाही
१२.लिंग : पुरुष / महिला
१३ अर्जदाराची शैक्षणिक अर्हता

| अक्र | शैक्षणिक पात्रता | उत्तीर्ण वर्ष | विद्यापीठ | एकूण गुण | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

१५.वर नमुर केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. मी तलाठी या पदाकरीता -----------(जातीचा प्रवर्ग) अर्ज सादर करीत आहे. सदर पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण केली आहे.ही खात्री करूनच अर्ज सादर करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो /करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळुन आल्यास नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणा-या कायदेशिर कार्यवाहीस मी पात्र राहीन. याबाबत माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही

---

**कोर्ट फी स्टॅम्प येथे चिकटवावे.**

**महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना.-अ**

**प्रतिज्ञापन**

नमुना-अ (नियम ४ पहा )

मी श्री / श्रीमती / कुमारी
---------------------------------------------------------------------------
श्री ---------------------------------------------------------------- यांचा / यांची / मुलगा / मुलगी / पत्नी वय ------------- वर्ष , राहणार
-------------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ---------------------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे .
(२) आज रोजी मला -------------इतकी हयात मुले आहेत , त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------------- आहे. ( असल्यास जन्म दिनांक नमुद करावा )
(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदांसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणिव आहे.

ठिकाण :-
दिनांक :- सही

**टिप :-** अविवाहीत उमेदवारांनी नमुना अ प्रतिज्ञापत्र लागू नाही असे नमूद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.